# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org

**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /माहीती/२०२०/1866

दिनांक :- 22.10.2020

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/२०२०/१८९ दि. ३० जुलै २०२०.

२.या कार्यालयाचे पृ.पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/शा.विसं.ब/२०२०/१३४० दि. ३०/७/२०२०.

३.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/कोविड/२०२०/१३५० दि. ३१ जुलै २०२०.

४.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :-विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०२०/१४६२ दि. २७ ऑगष्ट २०२०.

५.मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/२०२०/२८९ दि. २१ आक्टोंबर २०२०.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षाकरीता पदवीका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेबाबतची माहीती अचुक व अद्ययावत आवश्यक असण्याचे दृष्टीने संस्थांची शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता सबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार सबंधित विद्यापिठाकडून/परीक्षा मंडळाकडून सलग्नीकरण प्रदान केल्याची माहीती **http://dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर माहीती अद्ययावत करण्याबाबत आपणास संदर्भिय पत्रान्वये वारंवार कळविण्यात आलेले आहे. तथापी असे निदर्शनास आले की, काही संस्थांनी अजुनपर्यंत माहीती अद्यावयत केलेली दिसून येत नाही.

तेव्हा अश्या संस्थांना कळविण्यात येते की, उपरोक्त संकेतस्थळावर आपण भरलेली माहीती अद्ययावत असल्याची खात्री करावी तसेच सदर माहीतीत काही बदल करावयाचे असल्यास दिनांक २३/१०/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्युत तसे या कार्यालयास कळवावे जेणेकरुन माहीतीत बदल करण्याचे दृष्टीने आपणास या कार्यालयाव्दारे लिंक उपलब्ध करुन दिल्या जाईल. जर सदर कालावधीत संस्थांनी माहीती अद्ययावत करण्यात न आल्यास आणि ती माहीती अंतिम समजुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशाकरीता ग्राहय धरण्यात येईल. सदरहु कालावधीत आपणाकडून माहीती

अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करण्यात न आल्यास आणि ती माहीती केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपयोगात आणतांना त्यामध्ये कोणतीही चुक झाल्यास पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचणी उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित संस्थेची राहील, याची नोंद घ्यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.